


# ॥ज्योतिर्मय॥

Online Journal of Literature....

साहित्याचे विद्यापीठ

❑ पुणे ❑ वर्ष २ रे ❑ अंक ७४ वा ❑ भारतीय सौर दिनांक ०८ वैशाख शके १९४८, मंगळवार दि.२८ एप्रिल २०२६ ❑ पाने ४ ❑ मूल्य : निशुल्क (खासगी वितरणासाठी)


## विशेष लेख...

### त्वच्या दानाबाबत जनजागृतीची नितांत गरज

– प्रा डॉ सुधीर अग्रवाल

ज्योतिर्मय साहित्य

त्वचादान हे अवयवदानातील अत्यंत महत्त्वाचा पण दुर्लक्षित प्रकार आहे, ज्याबाबत जनजागृतीची नितांत गरज आहे. त्वचादानामुळे गंभीर भाजलेल्या रुग्णांचे प्राण वाचवता येतात. त्वचादान हे केवळ मृतदेहाचा भाग नसून, एखाद्याला नवीन आयुष्य देण्याची संधी आहे. त्यामुळे, देहदान हाच खरा मोक्ष या भावनेतून त्वचादानाची जनजागृती करणे काळाची गरज आहे. त्वचा दानाबाबत अजूनही लोकांमध्ये गैरसमज आहे. हा गैरसमज दूर करण्याची गरज आहे. यासाठी देशात जागृती करण्याची खरी गरज आहे.

त्वचादानाबाबत लोकांमध्ये अनेक गैरसमज आहेत, जसे की त्वचा काढल्याने मृतदेह विद्रूप होईल. प्रत्यक्षात, त्वचा फक्त मांडी, पाठ किंवा नितंबासारख्या झाकलेल्या भागातून काढली जाते. अवयवदानाविषयी, विशेषत: त्वचादानाविषयी माहितीचा अभाव असल्याने अनेक रुग्ण उपचारांच्या प्रतीक्षेत असतात. गंभीर भाजलेल्या रुग्णांमध्ये संसर्ग टाळण्यासाठी आणि वेदना कमी करण्यासाठी त्वचेचे कलम (स्किन ग्राफ्टिंग) करणे आवश्यक असते. त्वचादान केलेल्या व्यक्तीची त्वचा ५ वर्षांपर्यंत सुरक्षित ठेवली जाऊ शकते.

मृत्यू पडल्यानंतर ६ तासांच्या आत त्वचादान करता येते. हे नेत्रदानाप्रमाणेच मृत्यूनंतरही दुसऱ्याला जीवन देऊ शकते.

अनेक लोक डोळे किंवा किडनी दानाबाबत जागरूक असतात, पण त्वचादानाचा पर्याय त्यांना माहित नसतो.

जागतिक आरोग्य संघटना म्हणजे डबल्यूएचओच्या मते, दरवर्षी भारतात १० लाख लोक भाजण्याच्या घटनेचे बळी ठरतात. त्यात सौम्य आणि गंभीर भाजलेल्यांचा समावेश आहे.

सफदरजंग रुग्णालयाच्या बर्न अँड प्लास्टिक विभागातील विभागप्रमुख डॉ. शलभ कुमार म्हणाले की, आकड्यांचा विचार करता अनेक घटनांची तर नोंदही होत नाही. कारण रुग्ण काही लहान दवाखान्यांमध्ये जातात. त्यामुळं आकडे योग्यप्रकारे समोर येत नाहीत.

रुग्णालयात वर्षभरात सुमारे ७ हजारपेक्षा जास्त भाजलेले रुग्ण येतात. त्यात बहुतांश प्रकरणं स्वयंपाकघरातील दुर्घटनेची असतात, असं ते म्हणाले.

त्याशिवाय फॅक्टरी किंवा इतर ठिकाणी होणारे अपघात आणि ॲसिड हल्ल्यांतील रुग्णदेखील असतात.

डॉक्टरांच्या मते, भारतात जीवंत व्यक्तीला त्वचादान करता येत नाही. कारण तसं करणं अवैध आहे.

त्वच्या दानाबाबत  लोकजागृती अभावी त्वचा दानाचा गंभीर तुकडा पडत असल्याचे मत डॉक्टर सुनील केसवांनी यांनी तीव्र चिंता व्यक्त केली. अधिका अधिक लोकांनी त्वचा दानासाठी पुढे यावे या उद्देशाने नॅशनल पर्स सेंटरने संपूर्ण भारतात या मोहिमे बद्दल जागृती अभियान राबविले जात असल्याचे त्यांनी सांगितले. मुंबईतील स्किन बक्साना दरमहा आवश्यक असलेल्या त्वचा दाणा पैकी केवळ २५% सुदान प्राप्त होते याविषयी कोणतीही भीती न बाळगता अधिकाधिक दात्यांनी पुढे येऊन स्वेच्छेने त्वचा दान करावी आपल्या त्वचा दानाने अनेकांना त्यांचा निश्चित लाभ होईल असे आवाहन डॉक्टर केसवानी यांनी केले.

नॅशनल बन्स सेंटरची संचालक आणि प्लास्टिक सर्जन डॉक्टर सुनील केसवानी म्हणाले कदाचित दर दहा पैकी केवळ एकाच व्यक्तीला त्वचेची दान करण्याच्या पर्यायाबद्दल किंवा त्या प्रक्रियेबद्दल माहिती असावी जागृतीच्या या अभावामुळेच दरवर्षी भाजल्यामुळे जखमी झालेल्या रुग्णांपैकी केवळ अत्यल्प संख्येतील रुग्णांचाच त्वचेचे प्रत्यारोपण करणे शक्य होते, ही बाब अत्यंत चिंताजनक आहे. केवळ मुंबईचाच विचार करता आल्यामुळे जखमी होणाऱ्या रुग्णांची खरी संख्या अनेकदा कमी करून सांगितली जाते ज्यामुळे माहितीच्या अभावाची ही दरी आणखीनच वृंदावते भाजल्यामुळे जखमी झालेल्या रुग्णांची जीवन सुधारण्यासाठी समर्पित असलेली आमची संस्था दरवर्षी सुमारे ३००जागृती कार्यक्रम आयोजित करत आहे .

जागरुकता पसरवण्याची गरज

डॉक्टरांच्या मते, स्किन ट्रान्सप्लांटमुळं कोणताही अवयव किंवा स्नायूवर परिणाम होत नाही. तसंच त्यामुळे कोणत्याही प्रकारची शारीरिक कमजोरी येत नाही.अभ्यासकांच्या मते, त्वचादानाबाबत लोकांमध्ये जागरुकतेचा अभाव आहे. त्याचबरोबर सरकारनं राष्ट्रीय आरोग्य धोरणातही बदल करणं गरजेचं आहे.

डॉक्टर सुनील केसवानी म्हणाले की, एखादी व्यक्ती जेव्हा अशा घटनेची बळी ठरते तेव्हा त्यांना लाखो रुपयांचा फटका बसतो. त्यामुळं यासाठी निधीमध्ये वाढ करायला हवी.

दिल्लीतील ऑर्गन इंडियाचे डॉ. सौरभ शर्मा म्हणाले की, त्यांच्याकडं किडनी, डोळे किंवा देहदानाबाबत जास्त फोन येतात. पण त्वचादानाबाबत फोन येत नाही. कारण जागरुकतेचा अभाव आहे. पण याबाबत माहिती देऊन जागरुकता निर्माण करण्याचं काम करत असल्याचं त्यांनी सांगितलं.

तज्ज्ञांच्या मते, एका मृत शरिराद्वारे आठ लोकांचा जीव वाचवला जाऊ शकतो.

अशा परिस्थितीत शाळा, महाविद्यालयं आणि संस्थांमध्ये जाऊन सामाजिक संस्थांच्या मदतीनं लोकांमध्ये जागरुकता पसरवण्याची गरज आहे. त्यामुळं लोकांचा जीव वाचवता येऊ शकतो.

# अकोला जगातलं सर्वात उष्ण शहर

## ४६.९ अंश सेल्सिअस तापमानासह अकोल्याने केले रेकॉर्ड स्थापित, रविवारी देशातील १६ सर्वात उष्ण शहरांपैकी सहा शहरं महाराष्ट्रातील

ज्योतिर्मय साहित्य

मुंबई : रविवारचा दिवस महाराष्ट्रासाठी अत्यंत उकाड्याचा ठरला. कारण राज्यातील अनेक शहरांमध्ये सरासरीपेक्षा अधिक तापमानाची नोंद झाली. भारतीय हवामान विभागानुसार ४६.९ अंश सेल्सिअस तापमानासह अकोला हे देशातील सर्वात उष्ण शहर ठरलं आहे. त्यापाठोपाठ अमरावती (४६.८), वर्धा (४६.४), यवतमाळ (४६) आणि नागपूर (४५.४) यांचा क्रमांक लागला. ऐन उन्हाळ्यात, मे महिन्याच्या सुट्टीत माथेरान – महाबळेश्वरसारख्या थंड हवेच्या ठिकाणी जाऊन चिल होण्याचा विचार करत असाल, तर थांबा. कारण या ठिकाणचं कमाल तापमानही ३३ अंशांच्या पार गेलेलं आहे.




रविवारी देशातील १६ सर्वात उष्ण शहरांपैकी सहा शहरं महाराष्ट्रातील विदर्भ विभागातील होती. अकोला ४६.९ अंश सेल्सिअससह सर्वात उष्ण होतं; तर विदर्भाबाहेरील पुणे, सोलापूर आणि नाशिकमध्ये पारा ४० अंशांच्या पार गेला होता.

पश्चिम महाराष्ट्रात तापमान किती?

सोलापूरमध्ये कमाल तापमान ४३ अंश, त किमान तापमान २६.७ अंश सेल्सिअस इतके नोंदवले गेले. सातारा आणि सांगली जिल्ह्यांमध्ये प्रत्येकी ४१.४ अंश कमाल तापमान नोंदवले गेले, तर कोल्हापूरमध्ये त्यामानाने कमी, म्हणजेच ३७.६ अंश कमाल आणि २५.३ अंश किमान तापमान नोंदवले गेले.

पुण्यात तापमान ४१.८ अंशांच्या वर गेले. नाशिकमध्ये ४१.५, बीडमध्ये ४१.९ आणि अहिल्यानगरमध्ये ४१.७ अंश सेल्सिअस तापमान नोंदवले गेले. तर छत्रपती संभाजीनगर मध्ये ४३.४ अंश सेल्सिअस तापमान नोंदवले गेले.

थंड हवेच्या ठिकाणीही पारा वाढला

विशेष महाराष्ट्रातील थंड हवेची ठिकाणं म्हणून ओळखली जाणारी पर्यटन स्थळंही उष्म्यापासून सुटली नाहीत. हिल्स स्टेशनपैकी सातारा जिल्ह्यातील महाबळेश्वर येथे किमान तापमानात ३.९ अंशांची वाढ होऊन ते २३.४ वर पोहोचले. पुणे जवळील लोहगावचा अपवाद वगळता, राज्यातील तापमानातील ही सर्वात मोठी वाढ ठरली. लोहगावमध्ये रात्रीचे तापमान ५.३ अंश सेल्सिअसने वाढले होते. महाबळेश्वरचे कमाल तापमान ३३.७ अंश नोंदवले गेले. तर माथेरानमध्ये रविवारी कमाल तापमान ३७.२ अंश नोंदवण्यात आले.

# ''आरती प्रभू'' ऊर्फ चिंतामणी त्र्यंबक खानोलकर

ज्योतिर्मय साहित्य

२६ एप्रिल १९७६ रोजी मराठी साहित्यमनाचा एक अत्यंत संवेदनशील, तरल आणि अनुभवपर आवाज निवृत्त झाला, तो म्हणजे चिंतामणी त्र्यंबक खानोलकर यांचा. ज्यांना आपण ''आरती प्रभू'' या नावाने ओळखतो. २६ एप्रिल २०२६ रोजी त्यांच्या निधनाला अखंडपणे ५० वर्षे पूर्ण होत आहेत. त्यांच्या या ५० व्या पुण्यतिथीचा उल्लेख केवळ स्मृतिदिन न मानता, त्यांच्या लेखनाचे आजच्या काळात असलेले सांस्कृतिक आणि कलात्मक मूल्य समजून घेण्याचा एक निमित्त मानणे अधिक शोभणारे आहे.

चिंतामणी त्र्यंबक खानोलकर यांना मराठी साहित्यात एक बहुमुखी लेखक म्हणून ओळखले जाते.पण गायकरसिक, नागरिक आणि रेडिओप्रेक्षक त्यांना ''आरती प्रभू'' या नावाने जास्त जवळचे आणि जास्त भावाने ओळखतात. त्यांनी गद्यलेखनात आपले अस्तित्व चिंतामणी त्र्यंबक खानोलकर या नावाने ठेवले, तर कविता आणि गीतलेखनात त्यांचा आत्मा ''आरती प्रभू'' या नावाने व्यक्त झाला. या नावात ''आरती'' म्हणजे भावनांचा आदर्शसमर्पण आणि ''प्रभू'' म्हणजे अनंत अनुभवाचा स्रोतअसे दृष्टिकोन निर्माण होतात, जो त्यांच्या कवितेच्या भावपूर्ण आणि निसर्गवादी स्वरूपाशी अचूक जुळतो.

खानोलकर यांचा जन्म ८ मार्च १९३० रोजी रत्नागिरी जिल्ह्यातील वेंगुर्लेतालुक्यातील बागलांची राई येथे झाला. लहानपणचे कोकणातील निसर्गवातावरण, उथळपातळ नावगऱ्यांचा जीवनसंघर्ष आणि ग्रामीण जीवनाची ताजी भावनाचित्रे यांनी त्यांच्या डोळ्यांसमोर एक विशिष्ट दृष्टिकोन निर्माण केला. नंतर त्यांनी मराठी, तत्त्वज्ञान आणि साहित्यिक अध्ययनाचा अभ्यास केला, ज्यामुळे त्यांच्या काव्यात



निसर्गवर्णनाबरोबरच अंतःस्फूर्त तत्त्वज्ञानात्मक विचार दिसून येतात. २६ एप्रिल १९७६ रोजी मुंबईत त्यांच्या अकाली निधनाने मराठी साहित्याला एक गाभाळ झाले; पण त्यांच्या लिखाणातून उमलणारी भावपूर्ण तरलता आजही तेवढीच जिवंत आहे.

खानोलकर एक ''संस्कृतिमूल्य'' आणि ''रसिकाचा मनोरंजन'' यांच्या दोन्ही बाजूंना जुळणारे लेखक आहेत. त्यांच्या कवितासंग्रहांमध्ये ''जोगवा'' (१९५९), ''दिवेलागण'' (१९६२) आणि विशेषत्वाने ''नक्षत्रांचे देणे'' (१९७५) या नावांचा आग्रहपूर्वक उल्लेख होतो. ''नक्षत्रांचे देणे'' या कवितासंग्रहासाठी त्यांना साहित्य अकादमी पुरस्कार मरणोत्तर मिळाला, जो त्यांच्या लयमय कवितांच्या आंतरराष्ट्रीय गुणवत्तेचा आणि भारतीय भाषिक वातावरणातील वेगळ्या ओळखीचा पुरावा आहे.

त्याचबरोबर खानोलकर आजही मुख्यत्वे त्यांच्या गीतलेखनामुळे लोकप्रिय आहेत. पंडित हृदयनाथ मंगेशकर यांनी त्यांच्या बाणात घेतलेली गीते आजच्या काळातही तेवढीच रसिकांच्या मनावर राज्य करतात.

''गेले द्यायचे राहूनी, तुझे नक्षत्रांचे देणे''

''ये रे घना''

''तू तेंव्हा तशी''

या गीतांच्या ओळींमध्ये वेदना, विरह, आत्मसंभ्रम आणि निसर्गाचे अल्पशब्दी वर्णन त्यांच्या लेखनाचा ठसा दाखवतात. रेडिओ, टीव्ही, सिनेमा आणि साहित्याच्या विद्यार्थी वर्गांपर्यंत ही गीते अनुवादस्वरूपातही वापरली जातात.

खानोलकर फक्त कवी आणि गीतकार नव्हते; ते एक कथाकार कादंबरीकार आणि नाटककार म्हणूनही तुल्यकालीन आणि नंतरच्या पिढीच्या कलेला प्रभावित करणारे लेखक होते.

कथासंग्रह : सनई (१९६४), राखी पाखरू (१९७१), चाफा आणि देवाची आई (१९७५) यांमध्ये त्यांच्या पात्रांच्या मानसिक स्थितीचे नेमके आणि निर्विकार आकलन दिसून येते.

कादंबऱ्या : कोंडुरा, त्रिशंकु, गणुराय आणि चानी, पाषाण पालवी, अजगर, पिशाच्च यांसारख्या नावांनी त्यांची कथानककल्पना ओळखली जाते. या कादंबऱ्यांवर तेलुगू, हिंदी आणि मराठी चित्रपट, नाटक आणि टेलिव्हिजन अडॅप्टेशन झाले आहेत, त्यामुळे त्यांच्या कथाकल्पनेचा दृश्यसंस्कृतीवरही ठसा आहे.

त्यांच्या नाटकलेखनासाठी त्यांना 'संगीत नाटक अकादमी पुरस्कार (१९७६) मिळाला, जो त्यांच्या रंगमंचीय वाक्यरचनेला आणि त्यांच्या नाटकांच्या सामाजिकतात्त्विक आधाराला दिलेले गुण प्रमाण आहे. एक शून्य बाजीराव, अजब न्याय वर्तुळाचा, सगेसोयरे यांसारखी नाटके आजही रंगमंचावर आणि वाचासाहित्यात उल्लेखली जातात.






२०२६ च्या वेगवान, तंत्रज्ञाननिर्भर आणि शब्दकमी असलेल्या जगात खानोलकरांच्या लेखनाचा असा प्रभाव का टिकून आहे, हे प्रश्न वाचकांना उद्भवतो. उत्तर साधे आहे: त्यांच्या शब्दांमध्ये असलेले मानवी अस्तित्वाचे तत्त्वज्ञान,निसर्गाची संवेदनशील दृष्टी आणि  भावनांची अतिशय निर्भ्रम व्यक्तीमुखी वाटच त्यांनी दाखविली आहे.

****






## नवोदित साहित्यिकांसाठी सुवर्णसंधी

ज्योतिर्मय साहित्य महाराष्ट्रातील सर्व नवोदित लेखकांसाठी एक हक्काचे व्यासपीठ म्हणून पुढे येत आहे. फक्त साहित्यावर आधारित महाराष्ट्रातील एकमेव ई-दैनिक ज्योतिर्मय साहित्य हे आहे.
मागील दीड वर्षात या व्यासपीठावरून साधारण 150 + साहित्यिक तयार झाले आहेत आणि ही संख्या दररोज वाढत आहे.
नवोदित साहित्यिक या व्यासपीठावरून बिनधास्त लेखन करू शकतो कारण त्यांना योग्य मार्गदर्शन करणारी टीम येथे आहे. याचा अनुभव मागील वर्षात अनेक साहित्यिकांनी घेतला आहे. त्यांचे साहित्य या व्यासपीठावरून त्यांचा फोटो व मोबाईल क्रमांकासह देण्यात येते. त्यामुळे वाचक त्यांच्याशी थेट संपर्क करू शकतो.
ज्योतिर्मय च्या व्यासपीठावरून कोणीही आपले विचार मांडू शकतो, त्यांच्यासाठी अट फक्त एकच आहे. त्यांना रुपये पाचशे भरून वार्षिक सदस्यता घ्यावी लागते, नंतर ते वर्षात संपूर्ण 365 दिवस या व्यासपीठाचा वापर करू शकतात.
मित्रांनो मग वाट कसली बघता लगेच ज्योतिर्मय साहित्य चे मेंबर व्हा व लिहिण्यास सुरुवात करा, तुमचे उज्वल भवितव्य लवकरच येथे घडणार आहे.

@ संजय व्यापारी,
संपादक, ज्योतिर्मय साहित्य, पुणे
वार्षिक वर्गणी 7743918559 या नंबरवर किंवा दिलेल्या QR Code वर ऑनलाईन पाठवा. व पैसे भरल्याचा स्क्रिनशॉट पाठवा.




## जात्यावरच्या ओव्या......

ऊन चैत्र वैशाखाच
जसा लावला जाळ
शिवारी राबतो बाप
माय पाजती बाळ ||६१५||

ऊन चैत्र वैशाखाच
पाखरू लाहीलाही
हिरव्या पानांच्या आडून
कोप सूर्याचा पाही||६१६||


©® सौ. मनोरमा बोराडे
छत्रपती संभाजी नगर
मो. 70207 33758

## मनोपनिषद अर्थात मनाचे श्लोक-भाग २४




ज्योतिर्मय साहित्य

पण ज्यांना साधना मार्गावर वाटचाल करायची आहे, भगवंत जोडायचा आहे, त्यांना अशी बाष्कळ बडबड करून चालणार नाही. आपल्या वाचेने त्यांनी भगवंताचे नाम घ्यायला हवे. तशी सवय करायला हवी. उठत बसता, कार्य करता, सदा घेता देता... भगवंताचे नाम मुखात यायला हवे. मी जर साधक आहे आणि भगवंत प्राप्ती हे माझे ध्येय आहे असे जर आपण मनाशी ठरविले असेल तर जनांमध्ये मिसळताना सामान्य माणसांसारखी बडबड करून मला भागणार नाही. तसे केले तर मी माझ्या वाचेची शक्ती व्यर्थ घालवली असा त्याचा अर्थ होईल.



सुरुवातीला लोक मला नावे ठेवतील. माझी चेष्टा किंवा टिंगलटवाळी करतील पण मला भगवंत प्राप्तीसाठी ती सुद्धा सोसता आली पाहिजे. काही दिवसांनी लोकांना हे लक्षात येईल की ही व्यक्ती आपल्यासारखी नाही. ती साधक आहे. मग ते तुमच्याशी आदराने व्यवहार करतील. समर्थ या सगळ्या परिस्थितीतून गेले आहेत. ही परिस्थिती त्यांनी अनुभवली आहे आणि त्यातूनच त्यांचे हे अनुभवाचे बोल आले आहेत.

समाजात मिसळताना आपल्याला लोकांनी नावे ठेवू नये किंवा आपण कुठे कमी पडू नये म्हणून आपण त्यांच्यासारखे वागण्याचा प्रयत्न करतो. बरेचदा आपण जसे नसतो तसे दाखवण्याचा प्रयत्न करतो. मी विद्वान आहे, ज्ञानी आहे मला फार कळते अशा प्रकारचे मुखवटे धारण करतो. हा मुखवटा लोकांना दाखवण्यासाठी जरी असला तरी त्यातूनच अहंकार जन्म पावतो. अहंकार हे पापाचे मूळ आहे.


रावणाला स्वतःच्या शक्तीचा, सामर्थ्याचा केवढा अहंकार झाला होता ! जगामध्ये माझ्यासारखा कोणी नाही, मला कोणी हरवू शकत नाही हा त्याचा अहंकार त्याचे विनाशाला कारणीभूत ठरला. अहंकारातून अनेक नको असलेल्या गोष्टी घडतात. म्हणून समर्थ अहंतेला पापिणी असे म्हणतात.

म्हणून, हे मना, वाणीमध्ये भगवंताचे नाम ठेव आणि मनातून अहंकार दूर ठेव. यातच तुझे खरे कल्याण आहे.

स्वसंवाद माझ्या बोलण्यात भगवंताचे नाम कितपत आहे आणि व्यर्थ बडबड किती आहे?

भगवंताचे नाम घेण्याची सवय मी स्वतःला लावली आहे का ?

माझ्या मनात अहंकाराची छटा आहे का? ती ओळखून मी कमी करण्याचा प्रयत्न करतो आहे का? **(क्रमशः)**




## सुविचार - प्रकाश


प्रकाश शिवाजी भोंगाळे
मायणी ता खटाव जि सातारा
मो नं 9271686230



इतरांच्या सुख दुःखात सहभागी होणे
दुसऱ्यांच्या भावभावना जाणून घेणे
सामाजिक नैतिक मूल्यांची जपणूक करणे
हे ब्रीद मूल्य संस्काराच्या स्मरणार्थ ठेवावे

माणसाशी माणुसकीने वागणारा
सुसंस्कारित माणूस निर्माण करावा
त्यात बलिदान निस्वार्थ भावना जपणारा
आदर्श नवसमान निर्माण करावा

## त्याग हे यज्ञाचे खरे मर्म आहे



श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज

ज्योतिर्मय साहित्य

सदाचरणाने राहणाऱ्या माणसाला खर्च कमी लागतो, कारण खऱ्या समाधानाने पोट भरले की अन्नही कमी लागते. मी हे वारंवार सांगतो, कारण सदाचरणाचे, नीतिधर्माचे आचरण, हा परमार्थाच्या इमारतीचा पायाच आहे. पाया भक्कम नसेल तर त्यावरची इमारत जास्त दिवस टिकू शकणार नाही. त्याप्रमाणे नीती जर सांभाळली नाही, तर पुढच्या कर्माचा फारसा उपयोग होत नाही. परस्त्री मातेसमान माना, परद्रव्याची अभिलाषा बाळगू नका आणि परनिंदेला विष्ठा समजून त्याग करा. या तीन गोष्टींना फार सांभाळा. परमार्थाची इमारत या तीन गोष्टींवर उभी करायची आहे. नुसता पाया बांधून ज्याप्रमाणे घरात राहता येत नाही, त्याप्रमाणे पायाशिवाय इमारतही उभी करता येत नाही. 'राम कर्ता' ही भावना ठेवून नामात राहणे, म्हणजे परमार्थरूपी इमारतीत आनंदात राहणेच होय. व्यावहारिक मोठेपणा बाजूला ठेवा आणि देवाला अनन्यभावाने शरण जा. देवाला शरण जाताना सर्व विसरून जा. समजा, एखादा माणूस नाटकात राजाचे काम करीत असला आणि नाटक संपल्यावरही तो घरी घेऊन जर राजासारखे वागू लागला, तर त्याचा सर्व व्यवहार बिघडून जाईल; त्याचप्रमाणे, देवाला शरण जाताना, मी मोठा भक्त, विद्वान, पैसेवाला ही सर्व नाती विसरून गेले पाहिजे.

कर्माचे फळ आपल्या हातचे नाही म्हणून त्याची काळजी करू नये, हे समजले तरी, काळजी न करणे हे देखील आपल्या हातचे नाही म्हणून आपण काळजी करतोच ! यासाठीच भगवंताच्या नामात राहण्याची सवय करा. कर्म करणे यात विशेष नाही. आपल्याला कर्म केल्याशिवाय चैनच पडत नाही. 'कर्म करा' असे गीतेतही सांगितले आहेच. परंतु कर्म केल्याने पाहिजे ते फळ आपल्याला मिळतेच असे नाही; म्हणून भगवंताला स्मरून कर्म करा, आणि मग काय काय होते ते पहा. तेच निष्काम कर्म. भगवंताच्या इच्छेने सर्व घडते आहे ही भावना ठेवून आपले कर्तव्य करणे, हे सर्व गीतेचे सार आहे.

जो समजून त्याग करील त्याला फायदा होईल. नाहीतरी, संन्यास आणि त्याग दोन्ही आपल्याजवळसुद्धा आहेत. भगवंताच्या बाबतीत आपण संन्यासी वृत्ती धारण करतो आणि आपण आपल्या आईबापाला सोडतो असा त्याग करतो ! हे काय कामाचे ? त्याग हे यज्ञाचे खरे मर्म आहे. भगवंताच्या प्राप्तीच्या आड जे जे येते ते ते टाकणे, म्हणजे यज्ञ करणे होय. या यज्ञामध्ये वासनांची आहुती द्यावी. कोणत्याच गोष्टीबद्दल हवे अगर नको असे न वाटणे, हेच वासनांची आहुती दिल्याचे लक्षण आहे.

जेथे वासना संपली तेथेच भगवंताची कृपा झाली.

## || अध्यात्म ||

### मधुकर बोरीकर, पुणे

चुका

मागील अंकावरून......

गुरु द्रोणाचार्य यांनी जेव्हा त्यांचे शिष्य दुर्योधन व युधिष्ठिर यांना सभेमध्ये बसलेल्या पैकी सर्वात दुष्ट माणूस, पापी माणूस हुडकून काढण्याची सांगितले, तेव्हा दुर्योधनाला सभेतील सर्वच लोक पापी आणि दुष्ट दिसले. तर युधिष्ठीराला सभेमधील सर्वच लोक सद्शील, पुण्यवान दिसले. तो स्वतःच एकटा पापी आणि दुष्ट आढळला.

दुसऱ्या मध्ये चुका हुडकणे अतिशय सोपे आहे. स्वतःतील चुका हुडकायला मनाचा निर्मळपणा हवा.

आपल्या मनात इतरां विषयी विरोधी भाव जरी आले, तर त्याच्या मनात आपोआप आपल्याविषयी विरोधी भाव प्रकट होतात. हे एक मोठे चमत्कारिक मानस शास्त्र आहे. पण ते सत्य आहे. याचे उदाहरण असे की. एकदा एक राजा व एक व्यापाऱ्याचा मुलगा एकाच गुरुकुलात शिक्षण घेत होते. तेथील शिक्षण पूर्ण झाल्यावर तो राजकुमार आणि व्यापाऱ्याचा मुलगा परत आपापल्या गावी आले. राजकुमार कालांतराने राजा झाला. तर त्या व्यापाऱ्याचा मुलाचा आता व्यापारी झाला.व्यापार्याच्या मालकीचे एक मोठे चंदनाचे जंगल होते. आणि त्या जंगलातील चंदन विकून याचा व्यवसाय चालत असे. चंदन सारखी महागडी गोष्ट फारशी विकल्या जाई ना.म्हणून त्याचा व्यापार मंदावला. म्हणून तो व्यापारी आता चिंतेत पडला. एकदा त्याचा मित्र जो आता राजा झाला होता त्याची मिरवणूक लवाजम्या सहित या व्यापाऱ्याच्या घरासमोरून चालली होती. राजाचे सारे वैभव त्या मिरवणुकीतून दिसून येत होते.

क्रमशः.........

## || अभंग-माधव ||



माधव मनोहर जोशी
दादर, मुंबई.
मो. 9833159630



का रे हा माणूस । मुहुर्त शोधतो ।
आणि विसंबतो । त्याच्यावर ? ॥१॥
जन्मासी येताना । मुहुर्त नसतो ।
त्याने त्याचा होतो । काय तोटा ? ॥२॥
मरताना सुद्धा । मुहुर्त नसतो ।
प्राण तर जातो । क्षणार्धात ॥३॥
ठेवावा विश्वास । आत्म बलावर ।
त्या मुहुर्तावर । ठेवू नये ॥४॥
माधव हा म्हणे । जाणा तुम्ही सारे ।
विश्वास ठेवा रे । स्वतःवर ॥५॥




## पहाटे तुळशीला पाणी का घालावे?

ज्योतिर्मय साहित्य

(मागील अंकावरून)

नवऱ्याचे शीर पाहताच वृंदा चकीत होते आणि विष्णूला विचारते, तू कोण आहेस? त्यावर विष्णू आपल्या खऱ्या रूपात प्रकटतात. संतप्त झालेली वृंदा विष्णूला तू दगड होऊन पडशील आणि मला माझ्या पतीचा विरह तुझ्यामुळे घडला, तसाच तुलाही तुझ्या पत्नीचा विरह सहन करावा लागेल, असा शाप देते.

भगवंत तिची क्षमा मागतात.

तेव्हा वृंदा म्हणते, तू मला आता भ्रष्ट केलेस, आता मला कोण स्विकारील? तेव्हा भगवंत म्हणतात, 'मी तुझा

स्वीकार करतो. इतकेच नव्हे तर जे तुझी पूजा करतील त्यांच्यावर माझी कृपा असेल.' त्यानंतर वृंदा सती गेली. पुढे तिच्या शापामुळेच राम अवतारामध्ये भगवंताला सीतेचा विरह सहन करावा लागला.

देव दगड होऊन पडले. त्यालाच 'शालिग्राम' म्हणतात.

ज्या ठिकाणी तिच्यावर अंत्यसंस्कार झाले, तिथे तुळशीचे रोप उगवले. तीच ही तुळस. वृंदेच्या नावावरूनच ज्या ठिकाणी तुळस लावली जाते,

तिला 'वृंदावन' असे म्हटले जाते. तीच तुळस कृष्णाने, पांडुरंगानेही धारण केली. तिला भगवंताने स्वीकारले याचे प्रतीक म्हणून 'शालिग्राम' हा जो

दगड आहे, त्याला देव मानून त्याचा विवाह तुळशीसोबत लावला जातो. ती भगवंतांची प्रिय होते, म्हणूनच तिला धारण करणा-यांवर भगवंत प्रेम करतो, अशी श्रद्धा आहे. याच विचाराने वारक-यांनीही तुळशीला आजतागायत पूजनीय मानले आहे.

२) वैज्ञानीक महत्व-

जगातील प्रत्येक वनस्पती दिवसा ऑक्सिजन(२) व रात्री कार्बन डायऑक्साईड (२) सोडते. अपवाद फक्त पिंपळ, कारण पिंपळ रात्रीही ऑक्सिजन सोडतो.

म्हणुनच भगवान श्रीकृष्णाने म्हटले आहे की, सर्व वृक्षात मी अश्वथ-पिंपळ आहे. मात्र तुळस ही जगातील एकमेव वनस्पती आहे की जी दिवसा ऑक्सिजन, रात्री कार्बन डाय ऑक्साईड व फक्त पहाटेच्या वेळी ०.०३% इतका ओझोन-३ वायु सोडते.

व या वायुच्या संपर्कात मनुष्य आल्यास त्याच्या मेंदुत ५-सेरॉटोनीन नावाचे संप्रेरक (नेऊरोट्रांसमीटर) स्त्रवते. ज्यामुळे मनुष्य दिवसभर प्रसन्न व आनंदी राहतो. तसेच त्याची रोग प्रतिकारक शक्ती (इम्म्युन सिस्टिम) बळकट होते.

आयुर्वेदानुसार तुळशीमुळे सर्दी,

खोकला, ताप, त्वचारोग, मधुमेह, रक्तदाब, पोटाचे व किडनीचे विकार, कँन्सर, होत नाहीत. कारण तुळशीच्या बिया, मुळे, खोड, पाने, फुले (मंजिरी) हे सर्वच औषधी आहेत. शिवाय तुळशीतुन निघणाऱ्या शुभ स्पंदनांमुळे वातावरण शुद्धी होते. या सर्व बाबींचा गहन विचार करुनच पुर्वासुरींनी पहाटे तुळशीला पाणी घालण्यास सांगीतले आहे.

ज्याच्या घरची तुळस फुललेली असते, त्याच्या घरी पाण्याचा तुटवडा नसतो. जिथे रोज सायंकाळी दिवेलागण होते, तिथे भक्तीची कमतरता नसते.

जिथे शुभंकरोती होते, तिथे संस्कारची नांदी असते. जिथे दान देण्याची सवय असते.

तिथे संपत्तीची कमी नसते.

आणि जिथे माणुसकीची शिकवण असते, तिथे माणसांची कमी नसते.

***

संकलन –
डॉ. प्रमोद ढेरे (निसर्ग उपचार तज्ञ)
पिंपरी-चिंचवड, पुणे.
आरोग्यविषयक व्याख्याते व लेखक
संपर्क – ९२ ७१ ६६९ ६६९



## लघु बोधकथा

धनाचा विनियोग

एकदा एक कोल्हा जमिनीत बीळ खणत असताना खूपच खोल खणत गेला. खूप खोल गेल्यावर त्याला तिथे एक धनाचा हंडा दिसला व त्यावर एक वृद्ध नाग त्या धनाचे रक्षण करत होता. कोल्ह्याने नागाला विचारले,"हे नागदेवता, तुम्ही इथे काय करता आहात." नाग म्हणाला," माझ्या पूर्वजांनी पुरून ठेवलेल्या धनाचे मी रक्षण करत आहे." मग कोल्हा पुन्हा म्हणाला, " पण इथं इतकं मोठं धन असताना तुम्ही कधी त्याचा उपभोग घेतला आहे किंवा नाही. उपभोग सोडा थोडं फार धन दानापोटी तरी खर्च केलंत काय?" नाग म्हणाला," कसं शक्य आहे ? हे धन कमी होऊ नये म्हणून तर मी स्वत: या धनाचे रात्रंदिवस डोळ्यात तेल घालून रक्षण करत आहे. त्याचा उपभोग घेणे किंवा दुसयाला दान देणे ह्या पेक्षा या धनाचे रक्षण करण्यातच मला जास्त आनंद आहे." हे ऐकून कोल्हा नागाला म्हणाला," मग नागदेवा, तुमच्या असल्या या श्रीमंतीपेक्षा मी गरीब आहे तोच बरा.ज्या धनाचा उपभोग घेतला जात नाही व ज्यातून दान केले जात नाही अशा धनाचा काय उपयोग"

तात्पर्य –

ज्या धनाचा योग्य विनियोग न होता केवळ संचय केला जातो त्या धनाचा मनुष्य मात्राला काहीच फायदा नाही.

सिंह आणि लांडगा

एक सिंह आणि लांडगा असे दोघे वनातून फिरत असताना त्यांच्या कानी काही मेंढ़यांचा आवाज आला. तो आवाज ऐकून मोठ्या बढाईने लांडगा सिंहाला म्हणाला,"महाराज, तुम्ही आता चालून चालून दमला असाल, तेव्हा तुम्ही इथेच बसा. मी तुमच्यासाठी दोन-चार मेंढ्या मारून आणतो. याप्रमाणे बोलून लांडगा मेंढ्यांच्या आवाजाच्या रोखाने गेला असता त्याला त्या मेंढ्यांच्या कळपाजवळ मेंढ्यांचा धष्टपुष्ट मालक आणि चार शिकारी कुत्रे असल्याचे दिसले. त्याबरोबर तो लांडगा परत पावली सिंहाकडे आला व म्हणाला, " महाराज तुम्ही तर या जंगलाचे राजे आहात आणि तिकडे उभ्या असलेल्या मेंढ्या रोगट आणि अशक्त आहेत.इतक्या सा-या मेंढयामध्ये एकही मेंढी चांगली नाही तेव्हा आपण दुसरी कोणती तरी शिकार करणेच बरे होईल." सिंहानेही शिकारी कुत्र्यांचा आवाज ऐकला होता त्यामुळे सिंहाला लांडग्याचा धूर्तपणा लक्षात आला.

तात्पर्य – आपली असहाय्यता लपविण्यासाठी काहीना काही सबबी पुढे करणे हा प्राणीमात्रांचा स्वभाव आहे,

****

# भारतीय विचार साधना सभागृहात रंगले हास्य कवी संमेलन

**ज्योतिर्मय साहित्य**

पुणे : काल दिनांक २६ एप्रिल २०२६ रोजी साहित्य भारती पुणे शाखेच्या वतीने भारतीय विचार साधना सभागृहात हास्य कवी संमेलन आयोजित करण्यात आले होते.

या कार्यक्रमास प्रामुख्याने प्रसिद्ध हास्य कवी श्रीबंडा जोशी, साहित्य भारतीचे प्रदेश संघटन मंत्री श्री नितीन केळकर व नव्याने निवडून आलेल्या महाराष्ट्र साहित्य परिषद पुण्याच्या प्रमुख कार्यवाह स्वाती महाळंक या उपस्थित होत्या.

श्री बंडा जोशी यांच्या उपस्थितीने सगळ्या कवींना हास्य कविता या क्षेत्रातलं बहुमोल मार्गदर्शन मिळाल. प्रेक्षकांना सतत हसवत ठेवणं, ही कला किती अवघड असते? आणि जगातलं सगळ्यात सुंदर चित्र म्हणजे हसणारा प्रेक्षक हे पुलंनी सांगितलेलं वाक्य बंडाजींनी सगळ्या सहभागी कवींना सांगून कविता करणे आणि विनोद निर्मिती करून सगळ्यांना खळखळून हसवणं हे एक अत्यंत पुण्याचं काम आहे याची जाणीव करून दिली.

यानिमित्ताने डॉ. स्वाती महाळंक यांचा साहित्य भारतीच्या सदस्य आणि नव्याने निवडून आलेल्या महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या प्रमुख कार्यवाह यांचा सत्कार साहित्य भारतीचे प्रदेश संघटन मंत्री श्री नितीन केळकर यांच्या हस्ते करण्यात आला. तसेच नुकताच पापा या पुस्तकाला अमरेंद्र भास्कर पुरस्कार मिळवणारे साहित्यिक श्री गिरीश वसेकर यांनाही श्री बंडा जोशी, यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले.

या कवी संमेलनात सुरेश शेठ, पल्लवी देशपांडे, ज्योती उटगीकर देशपांडे, श्रीवल्लभ असावा, गिरीश वसेकर, रचना वसेकर, प्रसाद अत्रे, श्रेया जगदाळे, सुजाता भडभडे, राजेश लोंढे, अनुपमा ढमाळ, विशाल कर्णिक, मीनल गानू, सविता जोशी, विजय जाधव, गौरव नेवसे, संजय माने, महेंद्र माणिक, कार्तिक लव्हारे आदी कवींनी आपआपल्या बहारदार हास्य कविता सादर करुन टाळ्या मिळविल्या. विशेष म्हणजे, याप्रसंगी श्री नितीन केळकर यांनी सुद्धा आपली हास्य कविता सादर करून प्रेक्षकांना सुखद धक्का दिला !

कालचा हा कार्यक्रम अत्यंत सुंदर झाला. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ रसिका तुपे आणि अंजली अत्रे यांनी केले तर आभार प्रदर्शन आनंद देवचक्के यांनी केले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी चारुदत्त गंधे, शशांक महाजन, आनंद देवचक्के, रसिका तुपे, अंजली अत्रे यांनी विशेष प्रयत्न केले.

साधारणतः दर महिन्याच्या शेवटच्या शनिवारी साहित्य भारती पुणे शाखेच्या वतीने अनेक विविध प्रकारचे साहित्यिक कार्यक्रम आयोजित केले जातात आणि प्रेक्षकांचा त्याला भरपूर प्रतिसाद मिळत असतो.

# पुसद येथे स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्रांतर्गत विद्यार्थ्यांना मौल्यवान मार्गदर्शन

**ज्योतिर्मय साहित्य**

पुसद : कोषटवार दौलतखान विद्यालय व गोधाजीराव मुखरे कनिष्ठ महाविद्यालय, पुसद येथील स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्राच्या वतीने विद्यार्थ्यांसाठी विविध करिअर संधी व स्पर्धा परीक्षांविषयी मार्गदर्शनपर उपक्रमांचे आयोजन डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती पासून उपलब्ध करून देण्यात आलेले आहे. यामध्ये प्रामुख्याने प्रा.कांबळे सर, प्रा. शिंदे मॅडम, प्रा. हारीमकर मॅडम, प्रा.पांडे, डॉ.प्रा. विद्या गेडाम, प्रा. निलावर मॅडम, प्रा.मुखरे, प्रा.जागृत, प्रा. तायडे, विशाल पसारे, मुख्याध्यापक वायकुळे, ग्राम महसूल अधिकारी वर्षा कांबळे. या सर्वांनी विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षेच्या महत्त्वपूर्ण विषयावर मार्गदर्शन केले. दि. २७ एप्रिल २०२६ रोजी आयोजित सत्रात एन.सी.सी., एन.डी.ए. भरती प्रक्रिया आणि रोजगाराच्या संधी या विषयावर माधव बांगर (एनसीसी ऑफिसर) यांनी सविस्तर मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांना सैन्यदलातील करिअर संधी, प्रवेश प्रक्रिया, पात्रता, निवड पद्धती याबाबत उपयुक्त माहिती देण्यात आली.

तसेच क्रीडा क्षेत्र आणि रोजगाराच्या संधी या विषयावर विजय पाटील (शारीरिक शिक्षण शिक्षक) यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. क्रीडा क्षेत्रातील विविध रोजगार संधी, सरकारी व खाजगी क्षेत्रातील संधी, तसेच खेळाडूंना उपलब्ध सुविधा याबाबत माहिती देण्यात आली. या सर्व मार्गदर्शनाचा लाभ परिसरातील सर्व विद्यार्थ्यांनी घेता यावा यासाठी हे मार्गदर्शन शाळेचे स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र आणि शाळेच्या व्यवस्थापक मंडळाकडुन मोफत व खुले ठेवण्यात आलेले आहे.

# अजून दोन पानं

**ज्योतिर्मय साहित्य**



रात्रीचा तो निवांत क्षण घरभर पसरलेली निरव शांतता, खिडकीतून अलगद शिरणारी वाऱ्याची झुळूक आणि भिंतीवर टांगलेल्या घड्याळाची संथ टिक-टिक. टेबलावरील दिव्याच्या मंद प्रकाशात आपण हळूच एक पुस्तक उघडतो. अक्षरांवर नजर स्थिरावते, पानं अलगद उलटतात आणि नकळत आपण त्या शब्दांच्या दुनियेत हरवून जातो. ''झोपायचं नाही का अजून?'' आईचा हलकासा आवाज कानावर येतो. आपण थोडंसं हसतो, बोटं पानावर ठेवत म्हणतो, ''थांब ना, अजून दोन पानं'' त्या दोन पानांतच एक संपूर्ण आयुष्य दडलेलं असतं - भावनांचं, विचारांचं आणि स्वतःला शोधण्याचं.


आज चित्र बदललं आहे. ''काय बघतोयस एवढं?'' कोणी विचारलं की सहज उत्तर येतं, ''काही नाही, बस स्क्रोल करतोय'' अंगठा वर सरकतो आणि त्याचबरोबर आयुष्यही जणू पुढे सरकत राहतं. एक पोस्ट, मग दुसरी, मग तिसरी क्षणाक्षणाला काहीतरी नवीन समोर येतं; पण मनात साठत मात्र काहीच नाही. ''अरे वा!'' असा क्षणिक आनंद, ''हे काय आहे?'' अशी थोडीशी उत्सुकता आणि पुढच्याच क्षणी सगळं विरून जातं. काहीच मनात ठसत नाही, काहीच खोलवर भिडत नाही. थांबणं हरवलंय, म्हणून कदाचित जाणवणंही हरवत चाललंय.

पूर्वी पुस्तकं आपल्याला विचार करायला भाग पाडायची. ''हे पात्र असं का वागलं असेल?'' असा प्रश्न मनात रेंगाळत राहायचा आणि त्याच प्रश्नांतून विचारांची एक नवी दिशा उलगडायची. वाचन म्हणजे थांबणं होतं. जगापासून थोडं दूर जाऊन स्वतःजवळ येणं होतं. त्या शांततेत पुस्तकं ही एकांतातली सुंदर सोबत बनायची. कागदाचा मंद सुगंध, पानांचा कोमल स्पर्श आणि अक्षरांमधून उमटणारी भावना हे सगळं मनाच्या आत खोलवर साठून राहायचं. आज मोबाईलच्या स्क्रीनमध्ये गर्दी आहे - माहितीची, चित्रांची, आवाजांची. पण तरीही मन एकटंच वाटतं. ''ऑनलाइन आहेस, पण बोलत का नाहीस?'' हा प्रश्न आता नात्यांमध्येही ऐकू येतो आणि त्यात एक न बोललेली वेदना दडलेली असते.

हे तंत्रज्ञान चुकीचं नाही. हा बदलही अटळ आहे. पण या बदलांच्या प्रवाहात आपण काहीतरी मौल्यवान मागे सोडत आहोत, हेही तितकंच खरं आहे. पुस्तकं आपल्याला घडवत होती. संयम, संवेदनशीलता आणि विचारांची खोली देत होती. आजचं स्क्रोलिंग आपल्याला फक्त व्यस्त ठेवतं, कधी नकळत थकवतंही. ''एखादं पुस्तक घेऊन बसायला वेळ कुठे आहे आता?'' आपण सहज म्हणतो. पण खरंच वेळ नाही की आपणच वेळ देणं विसरलो आहोत? कदाचित पुन्हा सगळं जुनं परत येणार नाही, पण दिवसातले काही क्षण तरी आपण स्वतःसाठी राखून ठेवू शकतो. स्क्रीन बाजूला ठेवून एखादं पुस्तक हातात घेऊन त्या अक्षरांमध्ये हरवू शकतो.

कदाचित पुन्हा एखाद्या निवांत रात्री तोच ओळखीचा आवाज कानावर येईल, ''काय वाचतोयस?'' आणि आपण पुन्हा हसत म्हणू, ''थांब ना, अजून दोन पानं'' त्या क्षणी स्क्रोल होणाऱ्या या वेगवान जगात वेळ पुन्हा एकदा थांबेल आणि आपल्याला हलकंसं सांगून जाईल की आयुष्य फक्त पुढे सरकण्यासाठी नसतं; तर कधीतरी थांबून, अनुभवून आणि मनात साठवून ठेवण्यासाठीही असतं.

वाचन
॥ संस्कृती ॥
मंगेश दौंडकर, पुणे,
मो.- 9890619354



# उद्योजक महिलांसाठी ॲपशक्ती चा पिंपळे सौदागरमध्ये शुभारंभ

**ज्योतिर्मय साहित्य**



पुणे - महिलांच्या सक्षमीकरणासाठी विविध उपक्रम राबविणाऱ्या पिंपळे सौदागर येथील उन्नती सखी मंचच्या वतीने ॲपशक्ती डॉट कॉम या उपक्रमाचा प्रारंभ रविवार दि. २६ रोजी करण्यात आला. कुंजीर चौकाजवळील उन्नतीच्या प्रांगणात झालेल्या या उपक्रमाचे प्रभागातील भाजपाच्या नगरसेविका डॉ. कुंदा भिसे यांच्या हस्ते करण्यात आले. सदरील ॲप हे छोट्या आणि मध्यम स्वरुपाचा उद्योग - व्यवसाय करणाऱ्या महिलांसाठी उपयुक्त आहे. या ॲपमध्ये व्हाट्सअप ते वेबसाईट अशा प्रकारची प्रणाली विकसित करण्यात आली आहे. त्याव्दारे महिलांना आपला व्यवसाय - उद्योग अधिक व्यापक स्वरुपात करण्यासाठी मदत होणार आहे. उद्योगक्षेत्रात कार्यरत महिलांनी या ॲपचा स्वीकार करुन आपल्या व्यवसायवृद्धीच्यादृष्टिने प्रयत्न करावेत असे आवाहन या कार्यक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी बोलताना डॉ. कुंदा भिसे यांनी केले. उन्नती सोशल फाउंडेशनचे संस्थापक संजय भिसे यांनी आपल्या छोटेखानी भाषणात उपस्थित महिलांना शुभेच्छा दिल्या. ॲपशक्ती आणि उन्नती सखी मंचच्या उपाध्यक्षा डॉ. रश्मी मोरे यांच्या सहकार्याने आयोजित या कार्यक्रमात ॲपबद्दलची संकल्पना दिपा पाटील यांनी स्पष्ट केली. प्रास्ताविक आणि आभार प्रदर्शन भामिनी महाले यांनी केले. या कार्यक्रमास उन्नती सखी मंचच्या सदस्या आणि परिसरातील महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

# संविधान गौरव सन्मानाने शिक्षकांचा गौरव

**ज्योतिर्मय साहित्य**




परभणी - एकता सेवाभावी संस्था, महाराष्ट्र यांच्या वतीने भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त संविधान गौरव राज्यस्तर सन्मान कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. शिक्षण व सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या मान्यवर शिक्षकांचा यावेळी सन्मान करण्यात आला.

या कार्यक्रमात डॉ. योगीता देवगिरीकर यांना शैक्षणिक क्षेत्रातील उत्कृष्ट योगदानाबद्दल, जयश्री सोनवणे-गायकवाड,अर्चना सुदामे यांना सामाजिक क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल, संविधान गौरव सन्मानपत्र प्रदान करण्यात आले.

कुलगुरू मा. डॉ. इंद्र मनी, सिने अभिनेते अनिल मोरे, अरुण मराठे, डॉ. प्रल्हाद भोपे यांच्या हस्ते प्रमाणपत्र देऊन गौरव करण्यात आला.

हा कार्यक्रम विधी महाविद्यालय, शिवाजी महाविद्यालय परिसर येथे उत्साहात पार पडला. कार्यक्रमास विविध क्षेत्रातील मान्यवर, शिक्षक व सामाजिक कार्यकर्त्यांची उपस्थिती होती.

## चारित्र्यशील, धार्मिक और नीतिमान गुण स्वामिनी

# 'मंदोदरी'

लेखिका - डॉ. मीना श्रीवास्तव





अहल्या द्रौपदी सीता तारा मंदोदरी तथा ।
पंचकन्या ना स्मरेन्नित्यं महापातकनाशनम् ।।

ऊपर निर्देशित संस्कृत श्लोक की स्त्री - व्यक्तिरेखाएं हम सबके लिए अलग अलग कारणों के लिए आदर्श और श्रद्धा का विषय हैं और प्रात:स्मरणीय श्लोकों में उनका उल्लेख होने से वे जनमानस में वंदनीय हुई हैं | आईए पंचम पंचकन्या मंदोदरी की कहानी जानें | 'मंदोदरी' उसकी उत्पत्ति से ही अद्भुत किंवदंती बन गई थी | वह मूलत: स्वर्गलोक की मधुरा नामक एक चिरयौवना अप्सरा थी, परन्तु उसके हृदय में भगवान शिव के प्रति प्रेम भावनाएं उत्पन्न हुई | उनसे अभिभूत होकर वह पार्वती की अनुपस्थिति में शिव के निकट आई |
पार्वती कैलास पर्वत पर लौटी तो उसे मधुरा का सत्य विदित हुआ | तब अत्यंत क्रोधित हो कर पार्वती ने उसे बारह वर्ष तक मेंढक योनि में रहने का शाप दे डाला | परन्तु बाद में शिव शंकर की कृपा से वह एक सुन्दर युवती बन गई | उसकी उत्पत्ति मंडूक यानी मेंढक से हुई, इसलिए स्वयं भगवान शंकर ने उस सुन्दर कन्या का नामकरण किया 'मंदोदरी'| साथ ही भोलेनाथ ने उसे वर दिया कि वह एक पराक्रमी शिवभक्त (रावण) की महारानी और एक महापराक्रमी शिवभक्त (मेघनाद) की माता होगी| अब मनोरम रूप की धनी हमारी नायिका धरातल पर अवतीर्ण होकर एक वन में विचरण करने लगी | विधि का विधान देखिये, उसी वन में असुरों के राजा और स्थापत्यविशारद मयासूर और उनकी पत्नी हेमा नामक अप्सरा कन्या प्राप्ति की आस लगाकर भगवान शिव की आराधना कर रहे थे| तभी उस निर्जन कानन में इस कन्या को पाकर वे दोनों बहुत हर्षित हुए | उसे साक्षात् शिव जी का आशीर्वाद मानकर उन्होंने अत्यंत प्रसन्नता से मंदोदरी का कन्या के रूप में स्वीकार किया | इसलिए यह नवयुवती मयासुर तथा हेमा की अयोनिज कन्या कहलाई | 'मंदोदरी' इस नाम के साथ एक अन्य पुराण में वर्णित आख्यायिका के अनुसार मंदार और उदार नामक दो ऋषियों ने उनके तप में बाधा उत्पन्न करने वाली एक मेंढकी को शाप दिया | उसके उपरांत वायु और यम इन देवताओं ने उसे सुन्दर नवयुवती का रूप दिया| मंदार और उदार से शापित होने के कारण उन ऋषियों के ही नामों को जोड़कर उन देवताओं ने उस कन्या का नाम 'मंदोदरी' रखा |

यथावकाश मंदोदरी के माता पिता ने महाशक्तिशाली एवं वैभवशाली राक्षसराज रावण के साथ मंदोदरी का विवाह कर दिया| इस प्रकार हमारी नायिका का महाकाव्य रामायण में रावण की पटरानी के रूप में आगमन हुआ | शायद अति पराक्रमी लंकाधीश के राज्य की महत्वपूर्ण जिम्मेदारियों का वहन करते करते मंदोदरी अपने मायके में कभी गई नहीं | क्रमश:....

# ओळख साहित्यिकांची



## प्रा डॉ सुधीर नरसिंगदास अग्रवाल

- माजी उपप्राचार्य : सेठ केसरीमल पोरवाल कनिष्ठ महाविद्यालय कामठी जी. नागपूर
- शिक्षण : एम ए (राज्यशास्त्र, अर्थशास्त्र, स,शास्त्र, मानसशास्त्र, इतिहास) बी.एड, एम. फिल, पीएचडी
पत्रकारिता : डिप्लोमा इन एम सी जे,
पदवी : एम सी जे
पदविका : मानवाधिकार
- अध्यापन : एस के पोरवाल महाविद्यालय, कामठी, नागपूर, येथे राज्यशास्त्र विषयाचे अध्यापन
- अध्यापन अनुभव:-३४ वर्ष
- पुस्तके प्रकाशित:- १) भारत आणि जागतिक राजकारण २) फाळणी आणि भारताचे परराष्ट्र धोरण ३) मंथन ४) भारताचे परराष्ट्र धोरण मोदी पर्व भाग :१. ५)भारताचे परराष्ट्र धोरण मोदी पर्व भाग : २., ६) प्रश्नायन., ७) परामर्श.,
८)मराठीचा अपकर्ष संवाद, निष्कर्ष व ऑपरेशन सिंदूर प्रकाशनाच्या मार्गावर
- पत्रकारिता:- दै. म टाइम्स, दै. लोकमत, दै तरुण भारत, दै लोकशाही वार्ता, दै.देशोन्नती,दै पुण्यनगरी, दै सकाळ, दै जनमाध्यम, दै मुंबई चौफेर, दै. जनशक्ती, दै. प्रहार, दै नवाकाळ,दै विदर्भ मतदार, दैनिक दिव्य वतन, दै ज्योतिर्मय साहित्याचे विद्यापीठ पुणे, दैनिक सिंहवाणी वृत्त, नागपूर
- नियमित स्तंभ लेखन : दै.लोकशाही वार्ता नियमित स्तंभ लेखन 'विश्ववार्ता' सदर,
शिक्षकध्येय साप्ताहिक मध्ये नियमित स्तंभ लेखन, जीवनगौरव मासिक, संभाजीनगर
- पुरस्कार : १)गुणवंत शिक्षक गुरुगौरव शिक्षकरत्न पुरस्कार -२०१९
२) महाराष्ट्र राज्य आदर्श शिक्षक समितीचा आदर्श शिक्षक पुरस्कार
३)राज्य जीवन गौरव पुरस्कार २०२०
४) उडान फाऊंडेशनचा आदर्श शिक्षक रत्न पुरस्कार २०२१
५) राज्यस्तरीय मानव अधिकार पुरस्कार २०२१
६) म गांधी आंतरराष्ट्रीय आदर्श शिक्षक पुरस्कार २०२१
७) 'मंथन' या पुस्तकाची राज्य शिक्षण व सांस्कृतिक मंडळाच्या यादीत समावेश.
८) डॉ बाबासाहेब आंबेडकर उत्कृष्ठ पत्रकारिता पुरस्कार २०२१
९) राष्ट्रीय नवाचारी शिक्षक पुरस्कार,कुरुक्षेत्र, हरियाणा.
१०) अटलबिहारी वाजपेयी हिंदी प्रेरणा पुरस्कार
११ दिपगंगा भागीरथी बहुउद्देशीय सेवाभावी संस्था, मिरज ,सांगलीचा- निर्भीड पत्रकारिता पुरस्कार, २०२२
१२ स्वराज आंदोलनाचा "राष्ट्रीय कृतज्ञता पुरस्कार" २०२२"
१३ तेजभूषण बहुउद्देशीय सामाजिक संस्था वाशीमचा उत्कृष्ट पत्रकारिता पुरस्कार २०२२
१४ किरण बहुउद्देस्सीय संस्था वर्धा द्वारा मुक्ताई सन्मान पुरस्कार
१५ शिवछत्रपती राष्ट्रीय पुरस्कार २०२२
१६ बालरक्षक प्रतिष्ठान,बिहार बुद्ध गयाचा *राष्ट्रीय जीवनगौरव पुरस्कार* २०२२
१७ 'मदत' संस्थेचा राजर्षी शाहू महाराज समाजरत्न पुरस्कार २०२२
१८) लायन्स क्लब सेंटर कामठी उत्कृष्ट शिक्षक पुरस्कार,२०२५
१९) वर्ल्ड पार्लमेंट इंटरनॅशनल अवॉर्ड २०२५
२०) रेस रिलेक्शन एसी भारत सरकार व बिग मॅडी बेलफेअर फाउंडेशनचा समाजरत्न गौरव पुरस्कार २०२६
२१) प्रतिष्ठा फाउंडेशन चा प्रतिष्ठा साहित्य रत्न पुरस्कार २०२६
- युजीसीद्वारा आयोजित राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय एक दिवसीय सेमिनार मध्ये पेपर प्रस्तुत
१ भारतीय लोकशाही आणि विकास
२ बालकांच्या मानवाधिकाराचा प्रश्न
३ जनजातींचे प्रश्न आणि मानवाधिकार
४ भारताची फाळणी आणि महात्मा गांधी
५ प्राचीन भारतीय संस्कृतीचा जागतिक प्रभाव
६ यशवंतराव चव्हाण यांचे परराष्ट्र धोरण व संरक्षण धोरण
- अध्यक्ष : नागपूर विभाग, महाराष्ट्र राज्य राज्यशास्त्र शिक्षक परिषद.
- कोषाध्यक्ष : अभिजात मराठी शिक्षक साहित्य परिषद
- अध्यक्ष : राष्ट्रीय समता संघ

इमेल : drsudhiragrawal239@gmail.com
मो. ९५६१५९४३०६ / ७९७२११५९११

# वसेकर दाम्पत्याची तितीक्षा ग्रंथ पुरस्कारासाठी निवड

**ज्योतिर्मय साहित्य**





नांदेड सिटी,पुणे : येथील साहित्यिक श्री गिरीश वसेकर यांच्या ''पापा'' या किशोर लेख संग्रहाला व सौ रचना गिरीश वसेकर यांच्या ''निसर्गगंध'' या काव्य संग्रहाला तितिक्षा इंटरनेशनल पुणेचा तितिक्षा ग्रंथ पुरस्कार हा मानाचा पुरस्कार प्राप्त झाला आहे. गिरीश वसेकर यांच्या पापा या पुस्तकाला हा दुसरा मानाचा पुरस्कार आहे. विशेष म्हणजे पापा व निसर्गगंध या दोन्ही पुस्तकाचे प्रकाशक ज्योतिर्मय प्रकाशनचे संपादक, श्री संजय व्यापारी हे आहेत. प्रसिद्ध कवी, लेखक गीतकार डॉ श्री दासू वैद्य व महाराष्ट्र टाइम्स पुणेचे संपादक श्रीपाद ब्रम्हे यांच्या प्रमुख उपस्थितीत दिवाळी २०२५ दरम्यान हे प्रकाशन झाले होते. तितिक्षा ग्रंथ पुरस्कार सोहळा कार्यक्रम एक मे रोजी, भारत इतिहास संशोधक मंडळ, पोतदार सभागृह सदाशिव पेठ पुणे येथे संपन्न होणार आहे. तितिक्षा ग्रंथ पुरस्काराबद्दल, वसेकर दाम्पत्याचे सर्वत्र अभिनंदन होते आहे.

ऑनलाईन औषधोपचार



आता सर्वकाही झाले आहे ऑनलाईन मग आजारपणात पण घरबसल्या औषधोपचार घ्या, कुठेही जाण्याची गरज नाही, वेळ व पैसा वाचवा 100 % खात्रीशीर इलाज, गुप्तरोग, शारीरिक थकवा, बऱ्याच गोष्टी कोणालाही सांगण्यास लाज वाटते अशा वेळेस फक्त फोनवर तुम्ही तुमचा आजार सांगू शकता व त्यावर आयुर्वेदिक पद्धतीने हमाखास उपाय केला जाईल, पोस्टाने औषधं पाठविल्या जातील, प्रसिद्ध आयुर्वेदाचार्य डॉ. शेख ए एच, 37 वर्षाचा अनुभव, 200 पेक्षा अधिक पुरस्कार प्राप्त, 2 लाखांपेक्षा अधिक विविध लैंगिक समस्यग्रस्त रुग्णांवर यशस्वी उपचार, आतापर्यंत ५ ऑनररी डॉक्टरेटच्या पदव्या देऊन विविध संस्थांनी त्यांना सन्मानित केलेले आहे. त्यांच्या या कार्याची नोंद लंडन बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड, ओयासिक बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड, एशियन बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड, हुज-हू-इन एशिया रेकॉर्डस् मध्ये विक्रमी नोंद झालेली आहे. सेक्स विषयक कोणताही प्रॉब्लेम असो फक्त एकदा फोन करा व मार्गदर्शन घ्या. व तुमचे प्रश्न सोडवा.

Dr Shaikh A H - 98606 99906

# "ती" ची स्वप्नं, जबाबदाऱ्या आणि बंधनं



**ज्योतिर्मय साहित्य**

सायली दिसायला सुंदर, सोज्वळ. पाहताक्षणी नजरेत भरणारी अशी लग्न उंबरठ्यावरची पोर. शिक्षण पूर्ण झालं. आणि ऑफिसमध्ये चांगल्या पगाराची नोकरीही करू लागली. घरचालून स्थळ आलं. आईबाबांनी स्थळाला होकार दिला. पण सायली लग्नासाठी तयार नव्हती. ''आईबाबा, मला एवढ्यात लग्न नाही करायचंय. आत्ता कुठे शिक्षण पूर्ण झालं. आणि कामाला लागले. थोडंसं मनसोक्त जगूदेत मला. लग्नानंतर जबाबदाऱ्या तर असणारच. माझीही कांही स्वप्नं आहेत. कत्थक डान्स क्लास लावायचा आहे, पार्लर कोर्स करायचा आहे, साडी ड्रॅपिंग कोर्स करायचा आहे. लग्नानंतर नाही करू शकणार मी. पण बाबा मात्र त्यांच्या विचारावर ठाम होते.

स्थळ चांगलं आहे. लेक सुखा:त राहील. एवढाच विचार करत होते बाबा. लग्न झालं, सायलीच्या नव्या संसाराला सुरुवात झाली. नोकरी, घरातील दिवसभर न सरणारी अगणित कामं. पहाटे साखर झोपेतून उठणं आणि ऑफिसला जाईपर्यंत कामात व्यस्त असणं. असा सायलीचा नवा संसार. सायलीने नवऱ्याला इच्छा बोलून दाखवली. की मला कत्थक क्लास लावायचे आहेत. नवरा म्हणाला, ''आता हे कोणतं नवीन खुळ भरलं डोक्यात''. ''फार इच्छा आहे. कत्थक शिकण्याची. माझं स्वप्नं आहे ते''.

खुप विनवणीनंतर नवरा हो म्हणाला ऑफिस आणि डान्स क्लास करत सायली कसं का असेना पण तिचं स्वप्न जगत होती. पण, रोज रोज सासूचे टोमणे ऐकून सायली फार कंटाळली होती. ''काय तर म्हणे डान्स. अगं पाहुणे-राउळे, लोक आम्हाला नाव ठेवतात. बाईने लग्नानंतर फक्त संसारावर ध्यान द्यावं. तुझा डान्स महत्वाचा नाही. संसारातील मीठ, मिर्चू महत्वाचं आहे''. रोजची कुरबुर, वाद नको म्हणून सायलीने डान्स क्लास बंद केलं. आणि सायलीच्या हातातून तिचं एक स्वप्नं निसटून गेलं. आता प्रश्न होता नोकरीचा.

घरातील काम, जबाबदाऱ्या, ऑफिस

✍ सौ. मनीषा सोन्नेकर/सोनकांबळे
देगलूर. 9960028899



हे सर्व सांभाळताना तिचा जिव मेटाकुटीला जात असे. एका क्षणाला सायलीच्या मनात विचार यायचा नोकरी करावी कि नाही?. नवऱ्याचा असमजूतदारपणा सायलीच्या स्वप्नांना मागे खेचत होता. सायलीच्या आवडी निवडी घरात प्रश्न चिन्ह निर्माण करत होत्या.

बाळ झालं. सायली तिच्या अपुऱ्या स्वप्नांना ओंजळीत घेऊन उंबरठ्यातच थांबली. आणि सायलीने तिची सगळी स्वप्नं तिच्या मनाच्या अडगळीत संदूकात कायमस्वरूपी बंद करुन ठेवली. आता सायली तिच्या स्वप्नांपासून कोसो मैलो दूर होती. तिच्या स्वप्नांशी तिचं कांहीच देणंघेणं नव्हतं. तिने तिच्या आयुष्यात पहिलं प्राधान्य बाळाला दिलं. घर, बाळाचं संगोपन, ऑफिस यामध्ये ताळमेळ बसत नव्हता. म्हणून सायलीने नोकरीही सोडली. नोकरी, डान्स क्लास, साडी ड्रॅपिंग, पार्लर कोर्स. ही स्वप्न जणू तिची नव्हतीच कधी.

आपण कित्येक स्त्रियांच्या तोंडून ऐकतो कि, मला हे बनायचं होतं ते बनायचं होतं. पण, जबाबदाऱ्यांमुळे मी नाही करू शकले, नाही बनू शकले. माझं स्वप्नं स्वप्नच राहून गेलं. हेच तर असतं बाईचं बाईपण जगणं. स्वतःची स्वप्नं मनाच्या संदूकात अडगळीत ठेऊन द्यायची. आणि घरातल्यांच्या मर्जीत स्वतःला बांधून ठेवायचं.

अशा खुप क्वचित मुली असतील ज्यांना लग्ना नंतर मनसोक्त जगायला मिळतं. अशा खुप क्वचित मुली असतील ज्यांची स्वप्नं लग्ना नंतरही पूर्ण होतात वा पूर्ण केली जातात. अशा खुप क्वचित मुली असतील ज्यांना कसलीच बंधनं नसतात. क्वचित म्हणजे अगदीच बोटांवर मोजण्या इतकी. म्हणजे एक, दोन, तीन, चार, पाच. यापुढील अंक नाही घेतला तरी चालेल बरं का? कारण, आपला भारत देश मुली वा स्त्रियांच्या स्वातंत्र्याच्या बाबतीत अजूनतरी प्रगत झालेला नाही.

प्रत्येक मुलगी तिच्या मनाच्या हळव्या कोपऱ्यात असलेल्या बागेत रंगीबेरंगी स्वप्न पेरत असते. छोट्या पावलांनी का होईना पण ती तिच्या स्वप्नांकडे वाटचाल करीत असते. पण, खरंच लग्नानंतर कांही जणींची स्वप्न स्वप्नच राहून जातात.

जबाबदाऱ्या आणि बंधनं यामध्ये त्या प्रत्येकीच्या स्वप्नांची ओंजळ आणि स्वप्नांचं आभाळही नेहमी रितंच राहतं. पण तरीही, अपुरी स्वप्न, जबाबदाऱ्या आणि लादलेली बंधनं सोबत घेऊनच ती सर्वांसाठी पायरी होऊन झिजत असते.

# अनुभवाचे बोल सांगणारा... ''गाथा एक नाथा''

( भाग २)

**ज्योतिर्मय साहित्य**

रविवारच्या अंकावरून पुढे....


आठवणीतलं शेती वाडीचे शिवार
झाड झुडपं पशुपक्षी किड्या
मुंगीचेही उत्सव साजरं करणार
त्याच जागी वसलेलं नव
शिस्तबद्ध नगर
अंत्यविधीसाठी कर आकारणार...
डोक्याने चतुराईचा विचार केला
शेती नफ्याचे देणे फायद्याचे ठरले
हिरव्या रानटी भाल्यांनी हल्ला
करून
जिवाभावाचे शब्द दूरदेशी नेले
अजूनही शेतीवाडीच्या कविता
वाचताना
डोळ्यात नितळकांच पाणी येते,
लाजही वाटते..

एकेकाळी जिथे निसर्ग आणि सजीव सृष्टीचा उत्सव असायचा, तिथे आज इतकी शिस्त आली आहे की, माणसाच्या शेवटच्या प्रवासालाही अंत्यविधी कर लावला जातोय. निसर्गाचं मोफत देणं आपण नगर बनवून महाग करून टाकलं आहे.

आपण चतुराईने जमिनी विकल्या, नफा कमावला, पण त्या हिरव्यागार आठवणींना कॉंक्रीटच्या जंगलात गाडून टाकलं. शेतीवाडीच्या कविता वाचताना डोळ्यात येणारं पाणी ही त्या हरवलेल्या मातीची ओढ आहे, आणि लाज वाटते कारण हा विनाश आपण स्वतःच्या फायद्यासाठी स्वीकारला आहे. शहरीकरणाची टोचणी आणि हरवलेल्या निसर्गाची हुरहूर खूप प्रभावीपणे व्यक्त झाली आहे.

संदर्भ मरण
आपण गेल्यावर आठवणी सुद्धा
ठेवायला नको
वेळ नसतो कोणाला जपायला
आपल्यावर जीव टाकणारी मंडळीच
घाई करतात अंतयात्रेच्या तयारीला..

या कवितेतील वास्तव खूपच प्रखर आणि तितकेच कटू सत्य मांडणारे आहे. नात्यांमधील आणि काळातील बदललेल्या मानसिकतेवर अगदी मर्मभेदी भाष्य केले आहे. ज्यांना आपण आपले मानतो, जे आपल्यावर जीव लावतात, तेच अखेरच्या वेळी वेळेअभावी किंवा




जगाच्या रितीनुसार घाई करतात, हे मनाला चटका लावून जाते. ''आठवणी ठेवायला नको'' असं जेव्हा माणूस म्हणतो, तेव्हा त्यामागे खूप मोठी निराशा किंवा विरक्ती असते. कोणालाही वेळ नाही हे समजल्यानंतर आलेलं हे शहाणपण आहे.आयुष्यभर ज्या प्रेमासाठी आपण झटतो, त्या प्रेमाचा शेवट इतका व्यवहारिक असू शकतो, हे खूप कमी शब्दांत मांडलं आहे. अतिशय गंभीर आणि चिंतनशील विचार देशमुखांनी कवितेतून मांडले आहे.

दिलीप देशपांडे,
८९९९५६६९१७



संसार वारी
संसाराला असतो आरंभ
कधीच नसतो अंत
मरेस्तवर करावा नेटका
कधीच करू नये खंत...
आयुष्यभर संसारासाठी समर्पण
संसारी करतो
नात्यागोत्याच्या रूपानं वाट्याला
आलेल्या
देवदानवाला सांभाळतो

या ओळी संसारातील संघर्षाचे आणि कर्माचे वास्तव मांडतात. संसाराची सुरुवात तर आपण करतो, पण तो कधी संपेल हे आपल्या हातात नसते. जोपर्यंत श्वास आहे, तोपर्यंत संसाराची कर्तव्ये चालूच राहतात. संसार ही एक निरंतर प्रक्रिया आहे. अगदी शेवटच्या श्वासापर्यंत आपल्याला आपली जबाबदारी पार पाडावीच लागते. त्यातून सुटका नाही. सर्वात महत्त्वाचा विचार हाच आहे की, हे सर्व करताना मनात कधीही दुःख किंवा पश्चात्ताप (खंत) ठेवू नये. जे काही वाट्याला आले आहे, ते आनंदाने आणि कर्तव्य भावनेने स्वीकारावे. थोडक्यात, ''संसार ही एक अखंड साधना आहे, ती तक्रार न करता हसतमुखाने पार पाडावी'' असा हा मोलाचा सल्ला कवितेतून दिला आहे..

परमार्थ
नको जप तप नको संसार सोडणे
गाभाऱ्यातल्या विठ्ठलासाठी
नामदेव पायरी होणे..
तुडवी अहंकार पायी
उधळी गुलाल बुक्कावारी
तुळशी माळेतील मन राम कृष्ण
हरी...

ही सुंदर ओळ वारकरी संप्रदायाचा आणि विठ्ठल भक्तीचा गाभा मांडते. भक्तीच्या वाटेवर चालताना सर्वात आधी स्वतःचा मीपणा किंवा अहंकार बाजूला सारून तो पायाखाली तुडवावा लागतो. जोपर्यंत माणूस नम्र होत नाही, तोपर्यंत त्याला विठ्ठलाची ओढ लागत नाही. विठ्ठलाच्या नामाचा आनंद साजरा करताना आनंदाने गुलाल-बुक्का उधळला जातो. हे बाह्य आनंदाचे आणि भक्तीच्या रंगात रंगल्याचे प्रतीक आहे.वारी म्हणजे केवळ पंढरपूरची पायपीट नाही, तर गळ्यात तुळशीची माळ घालून सात्विक मार्गाने जाणे होय. जेव्हा मन शुद्ध होते आणि अहंकार जातो, तेव्हा मुखात आणि मनात राम कृष्ण हरी हा मंत्र आपोआप जपला जातो. थोडक्यात सांगायचे तर, अहंकार सोडून, विठ्ठलाच्या प्रेमात न्हाऊन निघून, सात्विकतेने देवाचे नामस्मरण करणे म्हणजेच खरी भक्ती.

देशमुखांचे जीवनानुभव कवितेतून व्यक्त झाले आहेत.

**(क्रमशः)**

# इतिहास माझ्या नावडीचा


**ज्योतिर्मय साहित्य**

सहामाही परीक्षेचा काळ होता. कृष्णा तेव्हा सहावीत होता आणि इतिहास हा विषय त्यांचा नावडता विषय. ''आई, ते सर इतिहास छान शिकवतात गं पण मला खूप झोप येते त्या तासाला आणि इतिहासाचा तास म्हटलं की अंगावर काटा येतो''. मी म्हटलं, ''असं करून कसं चालेल बाळा?'' मी हे वाक्य म्हटलं खरं पण मला माझं शालेय जीवन आठवलं. मला तरी कुठं आवडत होता इतिहास विषय? सणावळी पाठ करणं, एकामागून एक घटना, युद्धं, त्याची कारणमीमांसा, दुष्परिणाम, तह, पहिला राजा, दुसरा राजा, त्यांची नावं लक्षात ठेवा, कार्यकाळ लक्षात ठेवा आणि किती काय काय? दहावीत असताना महायुद्धाची कारणं, दुष्परिणाम लिहा या प्रश्नाचं उत्तर मी कसं लिहलं ते मला आठवलं. मी महायुद्धाची कारणं लिहिली होती की ज्या ज्या देशांत युद्ध झालं त्या देशांच्या राज्यकर्त्यांचे मतभेद झाले होते आणि परिणाम लिहले होते, युद्धात मोठ्या प्रमाणात मानवी संहार झाला. अनेक माणसं मेली, युद्धभूमीवर रक्तामांसाचा चिखल झाला होता. अनेक मुलं अनाथ झाली, अनेक महिला विधवा झाल्या, अनेकांची घरं उद्ध्वस्त झाली. कुटुंबच्या कुटुंब नाहिशी झाली.

मी माझं सगळं लेखन कौशल्य पणाला लावून दोन पानं भरून उत्तर लिहलं होतं. त्याकाळात आमची समजूत अशी होती की सर काही सगळं उत्तर वाचत नाहीत, फक्त लांबी बघतात उत्तराची आणि गुण देतात. त्यात माझं अक्षर अगदी वळणदार त्यामुळं मला वाटलेले खपून जाईल. पण नेमके ते शिक्षक पूर्ण उत्तर मन लावून वाचणारे निघाले. परीक्षेनंतर वर्गात पेपर दाखवतात त्यादिवशी जी काही माझी वरात निघाली होती तिचं वर्णन न केलेलंच बरं. पण सरांनी बाजूला घेऊन एक सल्ला मला दिल्याचं स्मरतंय.' तू लिहतेस चांगलं पण जरा अभ्यास करून लिही'. हा प्रसंग मला आठवला. गालातल्या गालात हसले मी आणि त्याला म्हटलं, 'चल, मी तुझा इतिहासाचा अभ्यास करून घेते'

पुस्तक उघडताच मलाच पेंग यायला लागली. पण मी मुठी आवळल्या. आज त्याचा इतिहासा विषयीचा कंटाळा घालवेनच. आईला असंच वागावं लागतं आपल्या आवडीनिवडी बाजूला ठेवूनच मुलांच्या समस्या हाताळाव्या लागतात धडा होता महापुरुषांची शिकवण सांगणारा.

कुणी काय उपदेश केला वगैरे. बराचवेळ खटपट केली पण पाठांतर काही होईना. माझ्याही मुठी सैल होऊ लागल्या होत्या. म्हटलं जरा मोकळ्या हवेत बसू, पाय मोकळे करु, जरा गप्पा मारू असं करत करत बराच वेळ गेला. हाती काहीच लागलं नाही. तो म्हणाला आपण ह्या प्रश्नाचं उत्तरच लिहायला नको परीक्षेत. पण ते मनाला काही पटेना. कारण हा प्रश्न खात्रीनं येणार हे माहिती असूनही



उत्तर पाठ करायचं नाही म्हणजे विनाकारण गुण गमावणं. बराचवेळ टाईमपास केल्यावर अचानक कृष्णाचा चेहरा उजळला. जवळपास ओरडलाच तो.

''आई, मला आयडिया सुचली''

अतिउत्साहानं मीही 'काय काय' असं ओरडले..

तो एकदम शहाण्यासुरत्या आजोबांच्या सुरात म्हणाला,

''सगळ्या महापुरुषांची शिकवण पुस्तकातल्या भाषेत नकोच पाठ करायला.. मी या शिकवणुकीचा मसावि काढतो''.(त्याचा हा शब्दप्रयोग ऐकून मला फार मोठा धक्का बसला होता तो अजूनही मला पचवता आलेला नाहीये)

माझा आ वासनेला असतानाच त्यानं कल्पनाविस्तार करायला सुरुवात केली.

''बघ आई, कुणाचीही शिकवण लिहायची असेल तर मी ती अशी लिहू शकतो. की यांनी असं सांगितलं की, सर्वांवर प्रेम करा, प्राणी-पक्ष्यांवर प्रेम करा. कुणाला दुखवू नका, मेहनत करा, खरं बोलावं, खोटं कधी बोलू नये., वडिलधाऱ्यांचा आदर करा. कुणाला कमी लेखू नका,'

माझ्या दोन ओठांमधलं अंतर आता वाढूच शकत नव्हतं इतका मोठ्ठा आ वासला गेला होता. म्हटलं,'' पढ्या, लिखो, देखेंगे''

अगदी एव्हरेस्ट सर केल्याचा आनंद त्याच्या चेहऱ्यावर झळकत होता.

या घटनेत कृष्णाची मानसिकता अगदी साधी आणि समजण्यासारखी दिसते. इतिहास या विषयाबद्दल त्याला भीती आणि कंटाळा दोन्ही वाटतात. ''इतिहासाचा तास आला की अंगावर काटा येतो'' या त्याच्या वाक्यावरून लक्षात येतं की विषय त्याला खूप अवघड, बोअर वाटतो. पण मनातलं सगळं मला सांगितलं त्यानं,


कृष्णाला पाठांतर अजिबात आवडत नाही. म्हणूनच तो सुरुवातीला ''हा प्रश्नच सोडून देऊ'' असं म्हणाला. म्हणजे तो थोडा शॉर्टकट शोधणारा आहे. पण तो तसा हुशारही आहे. ''मसावि काढतो'' ही त्याची आयडिया खूप वेगळी वाटली मला. म्हणजे तो शब्द न् शब्द पाठ न करता त्याचा अर्थ समजून स्वतःच्या भाषेत लिहायचा प्रयत्न करु पाहत होता.

म्हणजेच कृष्णा आळशी नाही, तर त्याला शिकवण्याची पद्धत बदलून हवी होती. तो थोडा खेळकर, विचार करणारा आणि स्वतःचा मार्ग शोधणारा मुलगा वाटला मला. योग्य पद्धतीने शिकवलं तर तो नक्कीच चांगलं शिकू शकतो. माझं विचारचक्र सुरू झालं.

का बरं मुलांना (आणि मलाही) इतिहास हा विषय आवडत नसावा?

सगळ्यांत आधी इतिहास शिकवताना पाठांतराला दिलं जाणारं अवाजवी महत्त्व हे एक प्रमुख कारण आहे. अनेकदा इतिहास म्हणजे तारखा, वर्षं आणि घटनांची यादी असंच चित्र विद्यार्थ्यांसमोर उभं राहतं. या सगळ्याचा अर्थ समजून घेण्याऐवजी ते फक्त लक्षात ठेवण्यावर भर दिला जातो. त्यामुळे विषयाचा गाभा समजून घेण्याऐवजी तो ओझ्यासारखा वाटू लागतो.

सौ. सविता कारंजकर,
सातारा



चांगले संस्कार

इतिहास हा मुळात अत्यंत रंजक गोष्टींनी भरलेला विषय आहे, पण त्या गोष्टी सांगण्याची पद्धत जर रुक्ष आणि एकसुरी असेल तर विद्यार्थ्यांच्या मनात उत्सुकता राहतच नाही याशिवाय, इतिहासाचा वर्तमानाशी असलेला संबंध विद्यार्थ्यांना स्पष्टपणे दाखवला जात नाही. ''हे शिकून आपल्याला काय उपयोग?'' हा प्रश्न अनेकांच्या मनात निर्माण होतो. जर भूतकाळातील घटना आणि आजच्या परिस्थितीतील संबंध विद्यार्थ्यांना समजावून सांगितले, तर इतिहास अधिक अर्थपूर्ण वाटू शकतो. अन्यथा तो केवळ जुन्या काळातील निरुपयोगी माहिती वाटते. तसेच, काही वेळा पाठ्यपुस्तकातील भाषा कठीण असल्यामुळे विद्यार्थ्यांना विषय समजण्यात अडचणी येतात. समजलंच नाही तर त्या विषयात रस निर्माण होईलच कसा? यासोबतच, आजच्या तंत्रज्ञानाच्या युगात भूतकाळाकडे पाहण्याची विद्यार्थ्यांची दृष्टीही बदललेली आहे. त्यांना वर्तमान आणि भविष्य अधिक आकर्षक वाटते, त्यामुळे इतिहास मागे पडतो.

एकूणच पाहता, इतिहास न आवडण्याची कारणं ही विषयात नसून तो शिकवण्याच्या आणि समजावून सांगण्याच्या पद्धतीत दडलेली आहेत. जर इतिहासाला गोष्टीचा, अनुभवाचा आणि विचारांचा विषय म्हणून मांडलं गेलं, वर्तमानाशी त्याची सांगड घातली आणि विद्यार्थ्यांना सक्रिय सहभागाची संधी दिली, तर इतिहास हा नक्कीच आवडता विषय ठरू शकतो.

हे जरनल संपादक व प्रकाशक संजय व्यापारी यांनी विंग बी३, फ्लॅट नं.७०१, व्हिसलिंग पाम्स हौ.सो., मानकर चौक, कस्पटे वस्ती, वाकड, पिंपरी-चिंचवड, महाराष्ट्र ४११०५७ येथून प्रकाशित केले. (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयाच्या कक्षेत) E-mail-jyotirmaysahitya@gmail.com, Mob. 7743818559